मुंबई विद्यापीठ

क्र. घ.म./ ३ / २०१३ - २०१४

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानीत महाविद्यालयातील संस्थाचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य यांचे लक्ष वेधण्यात येते की, मा. गौ.जो. रसाळ, सहसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, यांनी पाठविलेले पत्र क्र. एफपीपी-२४११/(प्र.क्र.२५९/१३)/विशि-३ दिनांक ३ जून २०१३ रोजीच्या पत्रानुसार C.M.J. विद्यापीठ, सिलॉग येथून देण्यात आलेल्या बनावट पीएचडी पदवी आधारे राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये करण्यात आलेल्या नेमणूकांबाबत माहिती मागविलेली आहे. सोबत सदर शासन प्रत्राची प्रत जोडली असून त्यानुसार सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयामध्ये C.M.J. विद्यापीठातुन पी.एच.डी. पदवी प्राप्त केलेल्या प्राध्यापकांची नावे व अनुषंगिक माहिती यांची पडताळणी करून कागदपत्रांसह विद्यापीठास दिनांक १० जून, २०१३ पूर्वी हस्तेबटवडा पाठवून द्यावी. सदर माहिती विद्यापीठास तात्काळ न पाठविल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहिल, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर बाब अत्यंत गंभीर व महत्वाची असल्याने त्यास प्रथम प्राधान्य देऊन कार्यवाही करावी हि विनंती.

मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ५ जून, २०१३

(डॉ. एम.ए. खान)
कुलसचिव

प्रति,

प्रत, सर्व संलग्नित महाविद्यालयीन संस्थाचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत माहीतीसाठी रवाना :-

१. मा. गौ.जो. रसाळ, सहसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
३. सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
४. सह संचालक, पनवेल विभाग, पनवेल, जिल्हा - रायगड.
५. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
६. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
८. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
९. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. एम.ए. खान)
कुलसचिव

महाराष्ट्र शासन

क्रमांक :- एफपीपी 2411/(प्र.क्र.259/13)/विशि-3
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032,
दिनांक : ३ जून 2013

प्रति,

कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे,

विषय :- C.M.J. विद्यापीठ, सिलाँग येथून देण्यात आलेल्या बनावट पीएचडी पदवी आधारे राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये करण्यात आलेल्या नेमणूका.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आज दिनांक 3 जून 2013 रोजी A,B.P. स्टार माझा या दूरचित्रवाणी वाहिनीवर राज्यातील विविध अकृषी विद्यापीठे व त्यांचे अंतर्गत महाविद्यालयांमध्ये सिलाँग येथून C.M.J. विद्यापीठातून पीएचडी च्या बोगस पदव्या प्राप्त करुन घेवून विद्यापीठे/महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांना सेवेत घेण्यात आलेले आहे, अशी बातमी दाखविण्यात येत आहे. ही अतिशय गंभीर आहे. अशा बोगस पदव्या प्राप्त करुन घेतलेल्या प्राध्यापकांच्या बाबतीत खालीलप्रमाणे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांची माहिती दिनांक 4 जून 2013 पूर्वी कोणत्याही परिस्थितीत शासनास सादर करण्यात यावी.

(अ) आपल्या विद्यापीठामध्ये अशा प्रकारे नियुक्त्या केलेल्या प्राध्यापकांची नांवे.

(ब) या प्राध्यापकांची नियुक्ती कोणी व केव्हा केली.

(क) अशा प्रकारे बोगस पीएचडी आधारे नियुक्त्या झाल्या असल्यास अशा नियुक्त्या तातडीने रद्द करण्यात याव्यात.

वरील बाबीस सर्व प्राथम्य देवून कार्यवाही करण्याचे निदेश आहेत.

आपला,

(गौ. जो. रसाळ)
सह सचिव,महाराष्ट्र शासन